## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुरोगामी माध्यमिक विद्यालयाची दहावीच्या निकालाची उत्कृष्ट परंपरा कायम

हवेली (दैनिक संध्या) : फेब्रुवारी /मार्च 2026 मध्ये झालेल्या इयत्ता दहावीच्या शालांत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या मध्ये पुरोगामी विद्यालय नायगाव ता हवेली या विद्यालयाचा निकाल ९६.८३% इतका लागला असून इयत्ता दहावी सेमी इंग्रजी वर्गाचा निकाल सलग १६ व्या वर्षी शंभर टक्के लागला आहे. या परीक्षेला विद्यालयातून 158 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी 155 विद्यार्थी उत्तीर्ण झाली आहेत. या परीक्षेत विद्यालयातील २२विद्यार्थी विशेष प्राविण्य,४८ विद्यार्थी प्रथम श्रेणी,५८ विद्यार्थी व्दितीय श्रेणी,२५ विद्यार्थी तृतीय श्रेणी व दोन विद्यार्थी एटीकेटी द्वारे ११वी साठी पात्र असा विद्यालयाचा एकुण निकाल ९८.१०% लागला आहे.खालील विद्यार्थ्यांनी प्रथम पाच क्रमांक पटकावले. १. जाधव राज तानाजी 93.80 % 2. कुमारी आबनावे आर्या दत्तात्रय 91.00% 3. कुमारी गजधाने पूजा विजय 88.80% 4. बरडे सार्थक आप्पाराव 88.20% 5. घोडके अमित जयराम 87.00%सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन पुरोगामी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ चोरघे, उपाध्यक्ष रामदास बापू चौधरी, सचिव रंगनाथ आप्पा कड व सर्व विश्वस्त तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

### जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

भिवंडी (दैनिक संध्या) : चिंबीपाडा येथील शासकीय आश्रम शाळेतील उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थ्यांचा सन २०२६ मध्ये १००% निकाल लागून प्रथम क्रमांक कुमारी करिश्मा विकास जाधव ८२.५% द्वितीय क्रमांक कुमारी प्राजक्ता सुनील गवारी ८१.८३% कुमारी जुईली पंडित कोंगील ७९.% कुमार स्वप्नील विष्णु झाटे ७८.६६% या विद्यार्थ्यांचे व शिक्षक कर्मचारी यांचे आदिवासी सेवक महाराष्ट्र शासन तथा आदिम आधार आदिवासी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित ठाणे, शिवसेना विधानसभा प्रमुख जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्था अध्यक्ष श्री महादेव आंबो घाटाल साहेब यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व शिक्षक वृंद यांना पुष्गुच्छ शाल भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला यावेळी उपस्थित सर्व आदिम आधार आदिवासी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित ठाणे संचालक तथा शाळा व्यवस्थापन समिती श्री चंद्रकांत जाधव ज्येष्ठ समाजसेवक बी डी पाटील काका आदिम आधार आदिवासी पतसंस्था मर्यादित ठाणे संचालक श्री अशोक भेकरे चिंबीपाडा ग्राम पंचायत सरपंच श्री अतिश कदम उपसरपंच श्री आनंद मुंडे ग्राम पंचायत सदस्य सौ शोभा जाधव श्री एकनाथ जाधव भिनार ग्राम पंचायत सरपंच श्री भरत घाटाल सोनाले ग्राम पंचायत उपसरपंच श्री अनिल भेकरे शासकीय आश्रम शाळा मुख्याध्यापक श्री संदीप कदम सर आदिम आधार आदिवासी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित ठाणे व्यवस्थापक सूरज मानकर श्री एकनाथ गुरोडा सर एकनाथ म्हस्कर सर इतर सर्व कर्मचारी विद्यार्थी उपस्थित विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला.

### कृषी औद्योगिक विद्यालय चांबळीचा निकाल 100 टक्के

जेजुरी (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ पुरंदर संचलित कृषी औद्योगिक विद्यालय चांबळी विद्यालयाचां इ दहावीचां निकाल 100 टक्के लागला असून उत्कृष्ठ निकालाची परंपरा विद्यालयाने कायम राखली आहे. श्रावणी संतोष माने हिने 93.40 टक्के गुण मिळवित प्रथम सई महादेव कामठे 92.60 टक्के गुण मिळवून द्वितीय तर पायल गोविंद कामठे हिने 91.60टक्के गुण मिळवित तृतीय क्रमांक पटकावला. विद्यालयाच्या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थ्यांचे श्रीनाथ शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष भैय्यासाहेब खैरे व सचिव संतोष जगताप यांनी कौतुक केले.

### एस.एस.सी.परीक्षेत श्री ज्ञानेश्वर विद्यालयाचे घवघवीत यश

आळंदी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या एस.एस.सी.परीक्षेत श्री ज्ञानेश्वर विद्यालयाने यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा निकाल तब्बल ९९.२० टक्के लागला असून विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयातील दहावीच्या एकूण ४५५ विद्यार्थ्यांपैकी ४५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून दोन विद्यार्थ्यांचा निकाल राखीव आहे. विशेष म्हणजे दिव्यांग विभागाचा निकालही नेहमीप्रमाणे शंभर टक्के लागला आहे. या निकालात ज्ञानेश्वरी प्रवीण पगार हिने ९५.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. यश किसन टोणपे याने ९४.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर पूजा जनार्दन बाबर आणि तन्मयी कृष्णा पवार यांनी ९४ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थी, पालक, प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, पर्यवेक्षिका अनिता पडळकर, अनुजायीनी राजहंस, हेमांगी उपरे तसेच सर्व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी सचिव अजित वडगावकर यांनी व्यक्त केली आहे.

### जागतिक मातृ दिनानिमित्त "विद्यार्थी हिताय पालक सुखाय" व्याख्यानमालेचे आयोजन

■ डॉ. भावेश भाटिया यांचे "रुक् जाना नहीं" प्रेरणादायी व्याख्यान १० मे रोजी पुण्यात

पुणे (दैनिक संध्या) : जागतिक मातृ दिनानिमित्त पुण्यातील यशवंत क्लासेसच्या वतीने "विद्यार्थी हिताय पालक सुखाय" या विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेअंतर्गत जागतिक कीर्तीचे अंध उद्योजक, पॅराऑलिम्पिक गोल्ड मेडल विजेते आणि सनराईज कँडल्सचे संस्थापक डॉ. भावेश हसुमतीबेन चंदुभाई भाटिया यांचे "रुक् जाना नहीं..." हे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती यशवंत इन्स्टिट्यूटचे संस्थापक शीतल पाटील यांनी दिली. हा कार्यक्रम रविवार, १० मे रोजी सकाळी ८.३० वाजता अण्णाभाऊ साठे सभागृह, सातारा रोड, पुणे येथे होणार आहे. स्वतः अंध असूनही हातगाडी विक्रेत्यापासून तब्बल ३५० कोटी रुपयांची उलाढाल असलेला उद्योग उभारणाऱ्या डॉ. भावेश भाटिया यांनी आपल्या सनराईज कँडल्स या उद्योगाच्या माध्यमातून १० हजारांहून अधिक अंध, दिव्यांग आणि अनाथ व्यक्तींना स्वावलंबनाचा मार्ग दिला आहे. विद्यार्थ्यांचे आयुष्य बदलणारे आणि पालकांना आयुष्यभराची ऊर्जा देणारे हे व्याख्यान प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांनी आवर्जून ऐकावे, असे आवाहन शीतल पाटील यांनी केले आहे. यशवंत क्लासेसच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून "मातृनाम प्रथम" शपथ ग्रहण समारंभ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जागतिक मातृ दिनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमामध्ये विद्यार्थी आपल्या नावामध्ये आईचे नाव प्रथम लावण्याची शपथ घेतात. तसेच सोशल मीडियावरील नावांमध्येही बदल करून आईच्या नावाचा सन्मान करतात.

# जेजुरीतील जिजामाता विद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम

जेजुरी (दै. संध्या)



**कु. प्रगती मंगेश कापरे ९४.८० टक्के गुण मिळवून प्रथम**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल नुकताच जाहीर झाला असून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज जेजुरी या विद्यालयाचा ९८.०२ टक्के इतका उल्लेखनीय निकाल प्राप्त करत उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.कु.प्रगती मंगेश कापरे ९४.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम,कु.पवार वैष्णवी निलेश ९४.६० टक्के गुण मिळवून विद्यालयात द्वितीय तर कु.पवार आर्या अनंता हिने ९३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. विद्यालयाच्या या दैदिप्यमान यशामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक व संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यालयातून दहावीच्या बोर्ड परीक्षेसाठी एकूण १५२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल १४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष श्रेणीत ५२ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ५९ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या मेहनतीबरोबरच शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले असल्याची भावना व्यक्त होत आहे. विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तसेच विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांनी समाधान व्यक्त केले.विद्यालयाचा निकाल हा केवळ टक्केवारी नसून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, शिक्षकांच्या समर्पणाचे आणि पालकांच्या विश्वासाचे फलित आहे. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, शिस्तबद्ध अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये असलेली क्षमता ओळखून त्यांना योग्य दिशा देण्याचे कार्य आमचे शिक्षक सातत्याने करत असतात. यामुळेच विद्यालयाने दरवर्षी यशाची परंपरा अबाधित राखली आहे,आगामी काळातही विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता अधिक वृद्धिंगत करून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण, तंत्रज्ञान आणि स्पर्धा परीक्षांचे सक्षम मार्गदर्शन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,असे प्राचार्य नंदकुमार सागर यांनी सांगितले.

संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव, माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थेचे संस्थापक सचिव डॉ.एम.एस.जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी,संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे,ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेच्या विश्वस्त सौ. राजवर्धनीताई जगताप,भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त डॉ. अस्मिताताई जगताप, व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे व रवींद्रपंत जगताप यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## सासवडच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा सरासरी निकाल ९८.८७ टक्के

सासवड (दै. संध्या)

■ ९८ टक्के गुण मिळवून जवळार्जुन विद्यालयाची प्रणिती राणे संस्थेत प्रथम

■ १९ पैकी १३ विद्यालयांचा निकाल १०० टक्के



शिक्षणमहर्षी स्व चंदूकाका जगताप यांनी स्थापन केलेल्या सासवड येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाने इयत्ता १० वी च्या उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यावर्षी संस्थेच्या विद्यालयांचा इयत्ता १० वी चा सरासरी निकाल ९८ . ८७ टक्के लागला आहे. संस्थेच्या १९ पैकी १३ विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. ९८ टक्के गुण मिळवून जवळार्जुन विद्यालयाची प्रणिती राणे संस्थेत आणि पुरंदर ग्रामीणमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे. संस्थेच्या एकूण ८०१ विद्यार्थ्यांपैकी ७९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रणिती शांताराम राणे ९८ टक्के (न्यू इंग्लिश स्कूल जवळार्जुन), इंद्रनील प्रविण दरेकर ९६.६० टक्के (शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल सासवड), मोनिका नवनाथ टेकवडे ९४.८० टक्के (जवळार्जुन) आणि प्रगती मंगेश कापरे ९४.८० टक्के (जिजामाता हायस्कूल जेजुरी) या विद्यार्थ्यांनींनी संस्थेत पहिल्या तीन क्रमांकात येण्याचा मान पटकावला आहे. तर सीबीएसई बोर्ड परीक्षेत संस्थेच्या सासवड येथील श्री शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या श्रेयस दीपक कुदळे ९७.८० टक्के आणि शिवांजली योगेश जगताप ९७.८० टक्के यांनी प्रथम तर आदीती जालिंदर यादव ९७.६० टक्के व आयष योगेश पराळे ९६.८० टक्के गुण मिळवून द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

संस्थेच्या माहूर माध्यमिक विद्यालय माहूर, हरणी माध्यमिक विद्यालय हरणी, मावडी पिंपरी हायस्कूल पिंपरी, न्यू इंग्लिश स्कूल जवळार्जुन, न्यू इंग्लिश स्कूल खामगाव मावळ, शिवशंभो माध्यमिक विद्यालय खळद, श्री काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय मालखेड, वाठार माध्यमिक विद्यालय वाठार, विद्यासागर माध्यमिक विद्यालय व्याहळी, राजुरी माध्यमिक विद्यालय राजुरी, सदगुरू कानिफनाथ माध्यमिक विद्यालय बोपगाव या मराठी विद्यालयांचा तसे जिजामाता इंग्लिश मिडीयम स्कूल जेजुरी आणि श्री शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल सासवड (सीबीएसई) या इंग्रजी माध्यमाच्या विद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. तर श्री शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल सासवड ९९.०९ टक्के, जिजामाता हायस्कूल जेजुरी ९८.०२ टक्के, गुरुकुल माध्यमिक विद्यालय सासवड ९७.९५ टक्के, श्री केदारेश्वर विद्यालय काळदरी ९७.५० टक्के, रिसे- पिसे माध्यमिक विद्यालय रिसे ९६.२९ टक्के आणि वाघेश्वरी माध्यमिक विद्यालय पिंगोरी ९२.३० टक्के निकाल लागला आहे. या यशाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांचे संस्थेच्या अध्यक्षा व सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, विशेष सल्लागार, सनदी अधिकारी राजेंद्र जगताप, माजी आमदार व संस्थेचे सचिव संजय जगताप, विश्वस्त डॉ अस्मिता जगताप, राजवर्धिनी जगताप, अर्चना मोरे, सोनाली शिंदे, संस्थापक सचिव प्रा डॉ एम एस जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे, विद्या समितीचे सचिव रवींद्रपंत जगताप यांनी अभिनंदन केले आहे.

## महेश थोरात यांच्या मदतीला धावले अमोल कामठे, घर बांधून देण्याचे आश्वासन

पुरंदर (दै. संध्या)



पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील नायगाव येथील महेश थोरात यांच्या मातेचे नुकतेच दुःखद निधन झाले. यापूर्वीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले असून बहिणीचेही लग्न झाल्याने महेश थोरात पूर्णपणे पोरके झाले आहेत. त्यांच्या या दुःखद परिस्थितीची दखल घेत ह.भ.प. अमोल कामठे यांनी त्यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेत आर्थिक मदतीचा हात पुढे केला. यावेळी अमोल कामठे यांनी महेश थोरात यांना धीर देत, "तुम्ही कोणतीही चिंता करू नका. भविष्यात येणाऱ्या प्रत्येक अडचणीत मी तुमच्या पाठीशी कायम उभा राहीन. तुम्हाला घर बांधण्यासाठी जागा तसेच घर बांधून देण्याची जबाबदारीही मी स्वीकारतो," असे आश्वासन दिले.

या प्रसंगी नायगाव येथील बापू कड,मोहन चौंडकर, बाळासाहेब कड,मंगेश चौंडकर,चंद्रकांत चौंडकर, संतोष गायकवाड,अजिंक्य कड, सुरज कड, यश कड आदी उपस्थित होते. गावकऱ्यांनीही महेश थोरात यांना मदतीचा हातभार लावत भविष्यातही सर्वतोपरी सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. महेश थोरात यांच्या दुःखाच्या प्रसंगी अमोल कामठे ,गावकऱ्यांनी दाखविलेली माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी याबद्दल सर्व स्थरातून कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.



## पुरंदर तालुक्याचा दहावीचा ९७ टक्के निकाल

जेजुरी (दै. संध्या)

■ तालुक्यातील 31 शाळांचा निकाल 100 टक्के

एस सी सी बोर्डाकडून इयत्ता १० वी चा निकाल जाहीर करण्यात आला असून पुरंदर तालुक्यातील ६४ माध्यमिक विद्यालयाचा एकूण ९६.६१ टक्के निकाल लागला आहे.तर 31 विद्यालयाचा निकाल हा 100 टक्के लागला आहे. पुरंदर तालुक्यातील माध्यमिक विद्यालयातील एकूण ३१३४ विद्यार्थ्यांनी दहावी चे परीक्षा फॉर्म भरले होते. यापैकी ३१३० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ३०२४ विद्यार्थी पास झाले. पुरंदर तालुक्याचा दहावीचा ९६. ६१ टक्के निकाल लागला आहे. ९३४ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्राविण्य मिळवले तर ११६८ विद्यार्थी प्रथम श्रेणी,७३१ विद्यार्थी द्वितीय श्रेणी, तर १९१ विध्यार्थी तृतीय श्रेणीतून उत्तीर्ण झाले आहेत. महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य नंदकुमार सागर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे, तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष दिलीप नेवसे,सचिव मारुती झगडे, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे, सचिव सचिन धनवट टी डी एफ चे अध्यक्ष जालिंदर घाटे, सचिव रमेश बोरावके. शिक्षेकेतर संघाचे अध्यक्ष सिद्राम कांबळे सचिव कीर्तीकुमार मेमाणे,यांनी विद्यार्थी व शाळांचे अभिनंदन केले.

## राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालयात महिलांसाठी एसटी स्मार्ट कार्ड शिबिराचे आयोजन

**महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

बारामती (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भारतातील सर्वाधिक मताधिक्याने विजयी आमदार म्हणून निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बारामती शहराच्या वतीने महिलांसाठी विशेष एसटी स्मार्ट कार्ड शिबिराचे आयोजन (दि:८) रोजी करण्यात आले आहे.महिलांना सवलतीच्या दरात एसटी प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय,शारदा प्रांगण येथे सुरू असलेल्या या शिबिराचे उद्घाटन बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड.किरण इंगळे यांच्या हस्ते संपन्न झाले.या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे,राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) सुरज देवकाते,विद्यार्थी अध्यक्ष मेघराज माने,उपाध्यक्ष अन्सारभाई आत्तार, सुधीर पोद्दार,शैलेश वनवे,नवनाथ अपुणे,शब्बीरभाई शेख,अश्विनी तावरे,हेमल शहा,ॲड.रमेश कोकरे,योगेश पवार,यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी महिलांसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार,खासदार पार्थ पवार तसेच युवा नेते जय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे ग्रामीण व शहरी भागातील महिला प्रवाशांना मोठा लाभ होणार असल्याचे सांगण्यात आले.शुक्रवार दि. ८ मे ते रविवार दि. १० मे २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हे शिबिर सुरू राहणार आहे.या शिबिरामध्ये १२ वर्षांवरील प्रत्येक युवती व महिलांसाठी एनसीएमसी (NCMC) स्मार्ट कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून,एसटी प्रवासासाठी हे कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. महिलांना सवलतीच्या दरात हे कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून, कार्डासाठी केवळ १३० रुपये शुल्क आकारले जात आहे.विशेष म्हणजे हे कार्ड एकदाच काढायचे असून त्याला कोणतीही कालमर्यादा नसल्याने ते कायमस्वरूपी वैध राहणार आहे.

कार्ड काढण्यासाठी महिलांनी आधार कार्ड सोबत आणणे तसेच स्वतः उपस्थित राहणे आवश्यक असल्याची माहिती शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे यांनी दिली.या उपक्रमामुळे महिलांना एसटी प्रवास अधिक सुलभ होणार असून शासनाच्या सवलतींचा थेट लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**महिलांसाठी एसटी स्मार्ट कार्ड शिबिर १० मे पर्यंत सुरू**

"बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय, शारदा प्रांगण येथे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेले विशेष एसटी स्मार्ट कार्ड शिबिर शुक्रवार दि. ८ मे ते रविवार दि. १० मे २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. १२ वर्षांवरील प्रत्येक युवती व महिलांसाठी एनसीएमसी (NCMC) स्मार्ट कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून, कार्डासाठी केवळ १३० रुपये शुल्क आकारले जात आहे. कार्ड काढण्यासाठी आधार कार्ड सोबत आणणे तसेच संबंधित महिलांनी स्वतः उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे आवाहन बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे यांनी केले आहे."

# आदिवासी समाजाची १२ हजार ५०० पदांची विशेष भरती रखडली

**ट्रायबल फोरमचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिवांना निवेदन**

भिवंडी (दै. संध्या)




राज्यभरात अनुसूचित जमातींच्या उमेदवारांची १२ हजार ५०० पदांची विशेष पदभरती तात्काळ करण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव यांना ट्रायबल फोरम नंदुरबार या संघटनेचे जिल्हाध्यक्ष नितीन तडवी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.विशेष म्हणजे गेल्या सात वर्षापासून अनुसूचित जमातीची विशेष पदभरती रखडली आहे.

निवेदनात नमूद आहे की,सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये ६ जुलै २०१७ रोजी ऐतिहासिक न्याय निर्णय दिला.तद्अनुषंगाने या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी उच्च न्यायालय मुंबई ,खंडपीठ नागपूर याचिका क्र.३१४०/२०१८ या प्रकरणात राज्यात शासकीय व निमशासकीय सेवेत आदिवासी करीता राखीव असलेली तब्बल १२ हजार ५०० पदे गैरआदिवासींनी खोटे जातप्रमाणपत्र सादर करुन बळकावली असल्याचे प्रतिज्ञापत्र खुद्द शासनानेच उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दिले होते.

ही पदे ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत रिकामी करुन भरण्यात येणार होती.परंतू गेल्या ७ वर्षात आजपर्यंत ६ हजार ८१० पदे रिकामी केली अन् केवळ १ हजार ३४३ पदेच भरण्यात आली आहेत. उर्वरित ११ हजार २२७ पदे भरण्यात आलेली नाहीत.

बिगर आदिवासींनी हडपलेली राज्यातील शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था,जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, मंडळे,महामंडळे, शासनाचे अंगिक्रुत व्यवसाय, विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये, क्रुषी विद्यापीठे, शासकीय शिक्षण संस्था (आश्रमशाळांसह), खाजगी शिक्षण संस्था, सहकारी संस्था, सहकारी साखर कारखाने,सहकारी सूतगिरण्या,सहकारी बँका,सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये ,यांना राज्याच्या तिजोरीतून निधी,अनुदान, सहायक अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था,मंडळे यांच्या आस्थापनेवरील अनुसूचित जमातींच्या राखीव जागा आजही रिक्तच आहेत.

विधिमंडळ २०२१ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात २ मार्च २०२१ रोजी ३१ क्रमांकावरील तारांकित प्रश्नाला खुद्द तत्कालीन मुख्यमंत्री यांनी लेखी उत्तर देवून सन २०२१ पर्यंत विशेष पदभरती करण्याची लेखी हमी विधीमंडळात दिली होती.त्यानंतर पुन्हा १० मार्च २०२२ ला विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चा झाली.या चर्चेला सामान्य प्रशासन विभागाचे तत्कालीन राज्यमंत्री यांनी विशेष भरती मोहीम राबविणार असल्याची सभागृहात घोषणा केली होती.

एकनाथ शिंदे -देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने १४ डिसेंबर २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन 'गट क' व ' गट ड ' मधील पदे भरण्याची कार्यवाही ३१ जुलै २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे आणि शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून एक महीण्यात जाहिरात प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले होते. अलिकडे ८ सप्टेंबर २०२५ रोजी सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन तीन महिन्यात जाहिराती काढण्याची जबाबदारी सामान्य प्रशासनावर सोपविण्यात आली होती.डेडलाईन संपली तरीही विशेष पदभरती जाहिरातींचा पत्ताच नाहीत.

"भारतीय संविधानाने आदिवासी समाजाला सात टक्के आरक्षण दिले आहे.मात्र गेल्या चार दशकात समाजाला केवळ तीनच टक्के आरक्षणाचा लाभ मिळाला आहे. चार टक्के आरक्षण बिगर आदिवासींनी लुटले आहे. बळकावलेल्या जागा रिकाम्या करुन विशेष पदभरती करण्यात यावी.

**- नितीन तडवी जिल्हाध्यक्ष, ट्रायबल फोरम नंदुरबार**